**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील महत्वाच्या स्थळांचा विकास करणे याअंतर्गत महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम मौजे मोखाडा, ता. भिवापूर जि. नागपूर करीता निधी मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : स्वंसेअं-२०१८/प्र.क्र.३२५/बांधकामे**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १ मार्च,२०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-२०१४/ प्र.क्र.६१/ बांधकामे, दि.१६/१२/२०१५.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन पत्र, क्र. बैठक-२०१८/ प्र.क्र.७६/ बांधकामे, दि.२१/०३/२०१८ चे इतिवृत्त.

२) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र जा. क्र. सकआ/ मावक/ऐति.स्थळ / मसिशिप्र/२०१७-१८/ का-१२/७२७४, दि.२९/०९/२०१८.

प्रस्तावना : -

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींची स्मारक बांधणे तसेच महत्वाच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करण्या बाबत संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या विहित कार्यपध्दती नुसार संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये, आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था संचालीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम मौजे मोखाडा, ता. भिवापूर जि. नागपूर करीता रु.३००.०० लक्ष इतक्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भिवापूर यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.३, नागपूर, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर तसेच कार्यवाह, महाबोधी सिध्दार्थ शिक्षण प्रसारक संस्था, नागपूर यांनी साक्षांकित केले आहे.

मा.मंत्री, (सा.न्या.व वि.स.) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीच्या दि. १३/३/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली होती. तदनुषंगाने सदर प्रस्तावाच्या रु. २,८१,६५,०००/- (रुपये दोन कोटी एक्याऐंशी लक्ष पासष्ट हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सादर केलेले महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम मौजे मोखाडा, ता. भिवापूर जि. नागपूर बांधकामाच्या रु. ३००.०० लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रकास सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक बाबींची छाननी व प्रशासकीय सहमतीसाठी सादर केले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेल्या रु. २,८१,६५,०००/- (रुपये दोन कोटी एक्याऐंशी लक्ष पासष्ट हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास विभागाने त्यांचेकडील निधीतून भागवावा या अटींच्या अधीन राहून, या प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. एकूण अंदाजपत्रकीय खर्चाच्या ९० टक्के म्हणजेच रू.२,५३,४८,५००/- इतका हिस्सा शासनाचा राहील व संबंधित संस्थेचा हिस्सा १० टक्के म्हणेजच रू.२८,१६,५००/- इतका असेल.

२. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयात नमूद मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम मौजे मोखाडा, ता. भिवापूर जि. नागपूर बांधकामाच्या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सदर शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तर समितीची राहील. वर नमूद सर्व अटी महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था, नागपूर यांना मान्य असल्याबाबत करारपत्र करुन घ्यावे. शासनाच्या वतीने करारपत्रावर सही करण्यासाठी प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर यांनी प्रकल्पाच्या बांधकामाच्या सद्य:स्थितीचा त्रैमासिक अहवाल आणि वितरीत केलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना वेळीच सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३ सदर बांधकामावरील खर्च हा मागणी क्र.एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०१- अनुसूचित जातीचे कल्याण, ८००-इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०५), स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (०५)(०२),स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने (वि.घ.यो.) (२२२५ ३६३६), ३१ - सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (योजनातर्गत-दत्तमत्त) या लेखाशीर्षाखाली सन २०१८-१९ या वर्षात मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर योजनेअंतर्गत आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच योजनेअंतर्गत मंजूर निधीचे वितरण हे संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयातील परिच्छेद २ (२) मध्ये नमूद अटीच्या अधीन काटेकोरपणे करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०३०११८०९४७८२२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.03.01 18:11:32 +05'30'

**(अनिल कों.आहिरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नागपूर.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, नागपूर.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/पुणे.
१०) अध्यक्ष, महाबोधी सिध्दार्थ प्रसारक संस्था, डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय प्रशिक्षण केंद्र, मौजे मोरवाडा ता. भिवापूर जि. नागपूर.
११) निवडनस्ती.